# सापळा केस

दिनांक १७/१२/२०१९

**आलोसे भानुदास उमाजी पवार, पोलीस नाईक ब.नं.३७, पोलीस ठाणे जिंतूर (वर्ग-३), यांनी १०,०००/- रू लाच मागणी केल्याचे यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तक्रारदार यांनी येथे दि. १३.१२.२०१९ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना व त्यांचे दोन चुलत भाऊ नामे प्रकाश रामा ढाकरे व रानुजी अंशीराम ढाकरे यांच्यावर पोलीस स्टेशन जिंतूर गुन्हा नं. ३९८/१९ कलम ३०७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार गुन्हयाचे तपासी अधिकारी शेख साहेब व त्यांचे मदतनीस हवालदार पवार साहेब यांनी त्या तिघांना दि. २०/११/२०१९ रोजी अटक केले व दोन दिवस पी.सी.आर. घेतली. त्यानंतर त्यांची एम.सी.आर.घेवून दि. ०३/१२/२०१९ रोजी जामीनावर मुक्त झाले. दरम्यान पवार साहेबांनी नमुद तक्रारदार यांना सांगीतले होते की, जामीन झाल्यावर त्यांना भेट म्हणून तक्रारदार व त्यांचे भाऊ प्रकाश ढाकरे दुसऱ्या दिवशी पवार साहेबांना भेटायला गेलो तेंव्हा पवार साहेब त्यांना म्हणाले की, तुला गुन्हयात खुप मदत केली. तसेच मी व शेख साहेबांनी तुझा से रिपोर्ट चांगला लिहीला आहे म्हणून तुमची जामीन झाली आहे. तुम्हाला गुन्हयात मदत करतो. तसेच शेख साहेबांना सांगुन गुन्हयाची चार्जशीट लवकर पाठवितो,हजेरी माफ करतो त्याकरीता तिघे मिळून १०,०००/- रूपये द्या असे म्हणून मला लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १४.१२.२०१९ रोजी तक्रारदार यांचे व त्यांचे दोन चुलत भावांचे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये शेख साहेबांना सांगून चार्जशिट लवकर पाठविणे, हजेरी माफ करणे यासाठी तडजोडीअंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून जेवढे पैसे शक्य होईल तेवढे स्विकारण्यास संमती दिली होती व लाचेची रक्कम सांगीतल्याप्रमाणे घेवून येण्याचे सांगीतले होते. परंतू नमुद आलोसे यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी सदरची लाचेची रक्कम स्विकारली नाही व ते आता तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारणार नाहीत असे तक्रारदार यांनी सांगीतले आहे. म्हणून यांचे विरूध्द पो.स्टे जिंतूर गुरनं ४९०/२०१९ कलमं ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ ( संशोधन २०१८) अन्वये दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोह/शेख शकील, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोशि/धबडगे, पोशि/चट्टे, पोह/हनुमंते, पोह/जहागीरदार, पोना/शेख मुखीद, पोशि/शेख मुक्तार, मपोशि/टेहरे, चापोह/चौधरी, चापोना/कदम अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा-या कारवाई बाबत अधिक माहितीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२-२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड - ८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला..प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड - ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी - ७०२१००२११०
श्री.अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी - ८०८७०७२९१९

Scanned by CamScanner